**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**

**राज्य भार प्रेषण केंद्र, कळवा**

**जाहिरात क्र. १/२०१६ अंतर्गत '<u>तंत्रज्ञ श्रेणी-४</u>' पदावर नेमणूक करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी / प्रतिक्षा यादी**

---------

महापारेषण कंपनीच्या **राज्य भार प्रेषण केंद्र, कळवा** कार्यालयाने प्रसारित केलेल्या जाहिरात क्र.०१/२०१६ अन्वये 'तंत्रज्ञ श्रेणी-४' या पदासाठी दि. २७.०८.२०१७ रोजी घेण्यात आलेल्या ऑनलाईन लेखी परीक्षेत उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे तसेच जाहिरातीत देण्यात आलेली 'तंत्रज्ञ श्रेणी-४' पदांची उपलब्ध संख्या व सामाजिक आरक्षण वगैरे बाबी विचारात घेऊन तात्पुरते पात्र ठरलेल्या उमेदवारांची 'तंत्रज्ञ श्रेणी-४' या पदाची तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी ही खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे.

१. उमेदवारांची तात्पुरती निवड ही उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये दर्शविलेली जात व इतर माहितीच्या आधारे करण्यात आलेली असून याबाबतची मूळ प्रमाणपत्रांची/ कागदपत्रांची पडताळणीवेळी तपासणी करण्यात येईल.

२. तात्पुरती निवड करण्यात आलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, प्रकल्पग्रस्त, महापारेषण कंपनीचे प्रकल्पग्रस्त, तसेच म.रा.वि.मंडळ / महापारेषण कंपनीत यशस्वीरित्या वीजतंत्री या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबतचे सर्व मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे हि पडताळणीच्यावेळी सादर करणे बंधनकारक राहील व ती सादर करु न शकल्यास उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

३. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक मिळण्याबाबतचा कोणता ही हक्क उमेदवारांना राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ही निवड यादी पुर्णतः जाहिराती मध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता आणि इतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधीन राहून तयार करण्यात आली आहे.

४. 'तंत्रज्ञ श्रेणी-४' पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करित नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींचा किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटींचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उमेदवारां जवळ असलेली पात्रता व सर्व आवश्यक कागदपत्रे ही जाहिरातीस अनुसरुन 'तंत्रज्ञ श्रेणी-४' या पदाकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत धारण / प्राप्त केलेले असणे व वैध असणे आवश्यक आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांनी आवश्यक पात्रता व कागदपत्रे ही जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत धारण / प्राप्त केलेली नसतील व वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्र व्यवहाराची दखल महापारेषण कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही.

६. 'तंत्रज्ञ श्रेणी-४' या पदाच्या तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवार हे कागदपत्रे पडताळणीत अपात्र आढळून आल्यास प्रतिक्षा यादी कार्यान्वीत करण्यात येऊन त्या यादीतील उमेदवारांची पात्रता व कागदपत्रे पडताळणी करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात येईल.सदर प्रतिक्षायादीतील उमेदवार सुध्दा पात्रता व कागदपत्रे पडताळणीत अपात्र ठरल्यास त्याखालील गुणवत्ताधारक उमेदवारांची स्वतंत्र निवड / प्रतिक्षा यादी लावण्याचे आधिकार महापारेषण कंपनी राखून ठेवत आहे.

७. तदर्थ म.रा.वि.मंडळ/महापारेषण कंपनीत 'वीजतंत्री' या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केलेल्या सर्व अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे त्यांनी ऑनलाईन परिक्षेत मिळविलेल्या गुणांच्या १०टक्के अधिक गुण त्यांच्या लेखी परिक्षेतील गुणांमध्ये मिळवून येणा-या गुणांच्या आधारे अंतिम निवड यादी तयार करण्यात आली आहे. त्यासाठी उमेदवाराने अर्ज करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत धारण केलेले 'वीजतंत्री' या व्यवसायातील उमेदवारी पूर्ण केल्याबाबतचे तदर्थ म.रा.वि. मंडळ / महापारेषण कंपनीने जारी केलेले वैध प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

८. महापारेषण कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांना जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे त्यांनी ऑनलाईन परिक्षेत मिळविलेल्या गुणांच्या १०टक्के अधिक गुण त्यांच्या लेखी परिक्षेतील गुणांमध्ये मिळवून येणा-या गुणांच्या आधारे अंतिम निवड यादी तयार करण्यात आली आहे. त्यासाठी उमेदवाराने संबंधीत जिल्हाधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी जारी झालेले प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचे विहित नमुन्यातील अर्ज करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत धारण केलेले प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

९. निवडसूची बनविताना ज्या उमेदवारांचे एकत्रित मिळविलेले गुण समान होते त्यामधील तदर्थ म.रा.वि. मंडळाचे / महापारेषण कंपनीकडे 'वीजतंत्री' या व्यवसायात शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच तदर्थ म.रा.वि. मंडळ / महापारेषण कंपनी किंवा बाह्यस्थ दोन किंवा अधिक उमेदवारांचे एकूण गुण समान असलेल्या उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवून त्यांच्यातील जेष्ठताक्रम (वयाने जेष्ठ असणाऱ्यास प्राधान्य) ठरविण्यात आला आहे.

१०. 'तंत्रज्ञ श्रेणी-४' या पदाची तात्पुरती निवड/ प्रतिक्षायादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामूळे झालेल्या चुका सुधारीत करून योग्य ती कार्यवाही करण्याचा अधिकार महापारेषण कंपनीने राखून ठेवलेला आहे.

११. 'तंत्रज्ञ श्रेणी-४' या पदाची तात्पुरती निवड/प्रतिक्षासूची ही निकाल घोषीत केल्याच्या तारखे पासून १ वर्षा करीता वैध राहील.

१२. अयशस्वी उमेदवारांनी व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महापारेषण कंपनीकडे करू नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्रव्यवहाराची महापारेषण कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१३. 'तंत्रज्ञ श्रेणी-४' या पदाच्या या तात्पुरत्या निवड / प्रतिक्षा यादीत समावेश असलेल्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीच्या पुढील प्रक्रिये संदर्भात महापारेषण कंपनीच्या www.mahatransco.in या संकेतस्थळावर सूचनापत्र देण्यात येईल /प्रसिध्द करण्यात येईल. त्यासाठी या उमेदवारांनी सदर संकेतस्थळावर जावून सुचनापत्र पहावे व त्याप्रमाणे कागदपत्रे पडताळणीसाठी सूचनापत्रात नमूद केलेल्या कार्यलयांत हजर रहावे.

१४. 'तंत्रज्ञ श्रेणी-४' या पदाची तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी खालीलप्रमाणे:-

**Select List (निवड यादी)**

| Sr. No. | Roll No. | Name of the Candidate Select List | Category | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1. | 2135406663 | SOMNATH NIVRUTTI DAGALE | ST | |
| **Wait List (प्रतिक्षा यादी)** | | | | |
| **Sr. No.** | **Roll No.** | **Name of the Candidate** | **Category** | **Remarks** |
| 1. | 1230801318 | RAMRATAN BRIJLAL SAWALKAR | ST | |

१५.सदर निकाल रिट याचीका क्र.४५६१/२०१६ बाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०५.१०.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने जाहीर करण्यात आलेला आहे.

- **उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षेत प्राप्त केलेले गुण पाहण्यासाठी येथे क्लिक करावे.**

सही/-

मुख्य अभियंता

राज्य भार प्रेषण केंद्र,कळवा

दिनांक:- १०.१०.२०१७

*************